# विद्यापीठात आणखी ४५० बेडचे रुग्णालय

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाची रुग्णसंख्या कमी होण्याऐवजी वाढतच आहे. रुग्णालये भरली आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिकेतर्फे तातडीची रुग्णालये सुरु करण्यात येत आहेत. शिवाजी विद्यापीठ एनसीसी ऑफिसशेजारील वसतिगृहात ४५० बेड क्षमता असणारे कोरोना केअर सेंटर सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. आज शुक्रवारी त्यांपैकी १५० बेड कार्यान्वित केले जाणार आहेत.

> वाढत्या रुग्णसंख्येचा विचार करुन येथे ४५० बेडचे कोरोना केअर सेंटर सुरु केले आहे. १५० बेड पहिल्या टप्प्यात होणार आहेत. यामध्ये लक्षणे नसणाऱ्या रुग्णांवर उपचार होणार आहे. ऑक्सिजन सिलिंडरसह तीन शिफ्टमध्ये येथे वैद्यकीय पथक नियुक्त करणार आहेत.
>
> **- निखिल मोरे,** उपायुक्त, कोल्हापूर महापालिका

कोल्हापूरमध्ये गेल्या १५ दिवसांत ४०० पेक्षा जास्त कोरोनाचे नवीन रुग्ण आढळून आले. यामुळे महापालिका, जिल्हा प्रशासन यांच्यावर प्रचंड ताण आला आहे. नियोजनानुसार सध्या सर्व रुग्णालये भरली आहेत.

नवीन येणारे रुग्ण, संपर्कातील नातेवाईक यांना कुठे ठेवायचे हा मोठा प्रश्न आहे. महापालिकेकडून यावर युद्धपातळीवर उपाययोजना केली जात आहे. चार दिवसांपूर्वीच शिवाजी विद्यापीठ डी ओ टी विभागात ३५० बेडचे हॉस्पिटल सुरु केले. सध्या २०० रुग्ण येथे उपचार घेत आहेत. शहरात वाढता रुग्णांची संख्या पाहता महापालिका शिवाजी विद्यापीठ एन सी सी ऑफिस परिसरातील वसतिगृहात आणखी एक रुग्णालय सुरु करीत आहे.

Kolhapur Main
Page No. 6 Jul 24, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

# विद्यापीठातील एका अधिकाऱ्याला कोरोनाची बाधा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : मुंबई, पुणे, औरंगाबाद आणि सोलापूर येथील विद्यापीठांपाठोपाठ शिवाजी विद्यापीठातही कोरोनाने शिरकाव केला आहे. या विद्यापीठातील एका अधिकाऱ्याला कोरोनाची लागण झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनाने अन्य अधिकारी, कर्मचाऱ्यांना दक्षता घेण्याची सूचना केली आहे.

संबंधित अधिकाऱ्याला गेल्या चार दिवसांपासून तब्येतीचा त्रास सुरु झाला. त्यांनी वैद्यकीय उपचार घेण्यासह स्राव तपासणीसाठी दिला. या तपासणीचा अहवाल बुधवारी पॉझिटिव्ह आला. त्यानुसार त्यांच्यावर पुढील उपचार सुरू करण्यात आले आहेत. या अधिकाऱ्याचा अहवाल पॉझिटिव्ह आल्याने विद्यापीठ कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. विद्यापीठ परिसरात सर्व ती काळजी घेतली जात असली तरी चिंता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, तब्येतीचा त्रास जाणवू लागल्याने गेल्या चार दिवसांपासून संबंधित अधिकारी विद्यापीठात आलेले नाहीत. मात्र, दक्षता म्हणून त्यांच्या विभागातील कर्मचाऱ्यांना काळजी घेण्याची आणि लक्षणे दिसत असतील, तर वैद्यकीय तपासणी करून उपचार घेण्याबाबतची सूचना केली असल्याचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी गुरुवारी सांगितले.

Kolhapur Main
Page No. 2 Jul 24, 2020
Powered by: erelego.com